**<u>वादीतर्फे विधिज्ञ श्रीम.एन.ई.नाईक यांचेमार्फत साक्षीदाराचा पुढील सरतपास शपथेवर सुरु</u>–**

१८. मी याकामी दावा मिळकतींचे सातबारा उतारे निशाणी १५ अनुक्रमांक १ व २ वर सादर केलेले आहेत. ते सार्वजनिक दस्ताऐवज असल्याने त्यास अनुक्रमे निशाणी १६ व १७ देण्यात येत आहे. मी आजरोजी निशाणी १५ अनुक्रमांक ३ वर प्रतिवादी मोहम्मद शकील शेख यांनी माझ्या हक्कात लिहून दिलेला हिब्बानामा सादर केलेला आहे. त्याची साक्षांकित प्रत ही मूळ दिलेल्या हिब्बानाम्याप्रमाणे बरोबर असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर हिब्बा लिहून देणार म्हणून प्रतिवादी मोहम्मद शेख यांची सही व अंगठा असून, हिब्बा लिहून घेणार म्हणून माझी सही व अंगठा आहे. त्यास निशाणी १८ देणेत येत आहे.

१९. मी आजरोजी निशाणी १५ अनुक्रमांक ४ वर 'दैनिक सागर रत्नागिरी' आवृत्ती मध्ये दिलेली जाहीर नोटीशीची साक्षांकित प्रत सादर केलेली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र.१९ देणेत येते. माझा दावा माझ्या मागणीप्रमाणे मंजूर करावा, अशी माझी विनंती आहे.

सरतपास पूर्ण.

**प्रतिवादी पुकारता गैरहजर. प्रतिवादी यांचेविरूध्द एकतर्फा प्रकरण सुरू असल्याने उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत
सही/-
(जी.ए.कुलकर्णी)
दि.२२.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),कुडाळ.

वरील जबाब साक्षीदारास वाचुन दाखविला असता तो मान्य असल्याचे कबुल करतो.

सही/-
दि.२२.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),कुडाळ.